धक्का! सुराज्य
गुरुवार, दि. १७ ऑक्टोबर २०२४ । पान १२

# महायुती आणि आघाडीमध्ये खलबतांना वेग

## ४८ तासात मोठ्या उलथापालथी

# ‘उत्तर’साठी मिळेना ठोस उत्तर!

### उमेदवारी सोडा, जागेचाच ‘प्रश्न’!


सुशीलकुमार शिंदे


विजयकुमार देशमुख


महेश कोठे

✔ सोलापूर/प्रतिनिधी

विजयाची हॅट्रीक करणाऱ्या भाजप आमदार विजयकुमार देशमुख यांच्या सोलापूर शहर उत्तर विधानसभेच्या मतदार संघावरदेखील संभ्रमाचे ढग कायम आहेत. आमदार देशमुखांच्या विरोधात असंतुष्टांनी कितीही वावटळ उठवली तरी देवेंद्रपंतांची कृपा मालकांवर पडणार, याबद्दल ठोसपणे सांगितलं जात असलं तरी देशमुखांऐवजी नवा चेहरा मैदानात उतरवला जाईल का? याबद्दलची अनिश्चितता सध्याही कायम आहेच आहे. याच मतदार संघातून आखाड्यात उतरण्याला वाट्याला असली तरी ही जागा आपल्या गटाकडे घेऊन या जागेवर महेश कोठेंना उमेदवारी देण्याचा घाट शरद पवारांचा असल्याचा बोलबाला आहे. तथापि, सुशीलकुमार शिंदे आणि प्रणिती शिंदे हे सोलापूर शहर उत्तरची जागा कोठेंसाठी सोडून देतील का? याबद्दलसुद्धा राष्ट्रवादी शरद पवार गटाबरोबरच, कोठे यांच्या समर्थक आणि हितचिंतकामध्ये संभ्रम असल्याचा बोलबाला आहे.

काँग्रेसकडून दावा असलेल्या या मतदार संघामधून लढण्यासाठी या पक्षामधील काही इच्छुक सज्ज झालेत, तथापि जागा काँग्रेसकडे कायम राहणार की नाही, याबद्दल चिंता आणि हुरहुर मनामध्ये दाटल्याची भावना या पक्षामधील पदाधिकारी, इच्छुक आणि प्रमुख कार्यकर्ते यांच्यामध्ये आहे.तथापि, एका बाजूला हे वास्तव असले तरी काँग्रेसच्या गॉडफादर खासदार प्रणिती शिंदे यांनी जिल्ह्यातील ज्या जागांवर दावा केला आहे, त्यामध्ये सोलापूर शहर उत्तरच्या जागेचा समावेश आहे. खासदार प्रणिती शिंदे या उत्तरची जागा काँग्रेस उमदेवाराकडून लढायला हवी, या भूमिकेवर ठाम राहिल्यास इच्छुकांमधील तुल्यबळ उमेदवाराचा मार्ग सुकर होताना महेश कोठे यांच्या अडचणी वाढू शकतात.

#### शहर उत्तर


ॲड. मिलींद थोबडे सज्ज झालेत, ते खरोखर लढणार की माघार घेणार, याविषयीचा संभ्रम आहे. शिवाय महत्त्वाचं म्हणजे माजी महापौर महेश कोठे यांच्या या मतदार संघातून लढण्याच्या भूमिकेबद्दल तर्कवितर्क आणि अंदाजांच्या चर्चेला उधाण आलं आहे. जागा कोणाला सुटणार ? शिवाय उमेदवारी कोणाला मिळणार? याबद्दल सोलापूर शहर उत्तर मतदार संघामध्ये कोणाकडून ठोस ङ्गउत्तरफ मिळेना हे वास्तव आहे.

खास करुन बाब म्हणजे महाविकास आघाडीच्या जागा वाटपात इथली जागा काँग्रेसच्या

### शरद पवारांच्या २० टक्यांच्या धोरणात ‘उत्तर’

राज्यातील २८८ विधानसभेचा जागा महाविकास आघाडीकडून एकत्रीत लढताना साधारण २० टक्के जागांची अदलाबदल करण्याची शरद पवार यांची भूमिका आहे. या अदलाबदलीमध्ये सोलापूर शहर उत्तर आणि सोलापूर शहर दक्षिण या सोलापुरातील दोन जागांचा समावेश असल्याची माहिती शरद पवार यांच्या अत्यंत निकटवर्तीयांकडून मिळाली. त्यातही महेश कोठे यांच्यासाठी उत्तरची जागा घेण्यावर मोठी भिस्त पवारांची असल्याचे सांगण्यात आले.

✔ मुंबई-सोलापूर/प्रतिनिधी



राज्य विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर की घडामोडींना आता प्रचंड वेग आला आहे. जागावाटप अंतिम करण्याच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये खल सुरु आहे. दरम्यान, पुढील ४८ तासात म्हणजे दोन दिवसांत मोठ्या राजकीय उलथापालथी होणार आहे. कितीही दमटवलं तरी जागा वाटपाचं घोडं जागेवरच अडल्यानं महाविकास आघाडी आणि महायुती यांच्या पुढं समजोता घडवून आणण्याचं मोठं आव्हान आहे. इच्छुकांचं उमेदवारी मध्ये समाधान न झाल्याने त्यांच्याकडून बंडाचे निशाण फडकवलं जाणार आहे, त्यामुळे उमेदवारीचा बी फॉर्म उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम तारखेपर्यंत देण्याचं नियोजन महाविकास आघाडी आणि महायुतीकडून केलं जाणार असल्याचे सांगण्यात आलं.

खास बाब म्हणजे ज्या ठिकाणी संबंधित पक्षाचा आमदार आहे, ती स्टँडिंग ची जागा त्याच पक्षाकडे ठेवण्याचा निर्णय महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्हींकडून घेण्यात आल्यानं संबंधित ठिकाणच्या उमेदवारांचा घोळ देखील कमी आहे. त्या ठिकाणी कोण उमेदवार द्यायचा, यासंबंधींची यादी फायनल झाल्याचंही मुंबई स्थित अधिकृत सूत्राने सांगितलं.

ज्या विधानसभेच्या जागेसाठी इच्छुकांची संख्या मोठी आहे, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर बंडखोरी होणार आहे, ही बंडखोरी टाळण्यासाठी संबंधितांची मनधरणी करण्यासाठी पक्षश्रेष्ठींकडून मोठ्या प्रमाणावर बैठका घेतल्या जाणार असल्याचं सांगण्यात आलं.

महाविकास आघाडीचा विचार करता २८८ जागांपैकी २१४ जागेचं वाटप निश्चित करण्यात आला आहे. काँग्रेसला सर्वाधिक ८४ तर उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरचंद्र पवार गटाला प्रत्येकी ६५ जागा देण्याचे धोरण निश्चित केलं आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचा विचार करता मोठा भाऊ भाजप म्हणून या पक्षाला १५५ ते १६०जागा एकनाथ शिंदे शिवसेना गटाला ७८ ते ८० आणि अजित पवार राष्ट्रवादी गटाला ५० ते ५५ जागा देण्याचा निर्णय झाल्याची माहिती मिळाली आहे. ज्या जागेच्या ठिकाणी अडचणी नाहीत, तिथल्या उमेदवाऱ्या दोन घोषित करण्यात येणार आहेत.

### २० टक्के जागांवर अदलाबदल शक्य

विधानसभेच्या २८८ जागांपैकी महाविकास आघाडीत २० टक्के जागांवर अदलाबद्दल होण्याची शक्यता आहे. साधारण १५ ते २० जागांचा घोळ हा शेवटपर्यंत सुरुच राहणार आहे. या जागा वगळता अन्य ठिकाणच्या उमेदवाऱ्या घोषित करण्यासंदर्भात तयारी पूर्ण झाली आहे असं सांगण्यात आलं.

### शरद पवार म्हणाले, तर तुम्ही सगळेच या !

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या तुतारी चिन्हावर लढण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील अनेक मतदारसंघांमध्ये खूप जण इच्छुक आहेत. उमेदवारी नाही मिळाल्यास संबंधितांकडून बंडखोरी होऊ शकते, यावर पर्याय म्हणून शरद पवारांनी लोकसभेचा पॅटर्न राबवायला सुरुवात केली आहे. विधानसभेच्या ज्या मतदार संघामध्ये राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटासह काँग्रेस आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे जे इच्छुक आहेत त्यांना बैठकीसाठी बोलवलं जात आहे. या बैठकीत तुल्यबळ कोण निवडून येण्याची क्षमता कोणाची आहे यावर चर्चेच्या फायद्या झडत असून या बैठकीतच उमेदवारीचा एक चेहरा फायनल करण्याची जबाबदारी शरद पवार यांच्याकडून उपस्थित यांवर टाकली जात आहे. त्यातून उमेदवारीचा एक चेहरा निवडला जात आहे. लोकसभेला हा पॅटर्न यशस्वी झाल्यानंतर शरद पवारांनी विधानसभा निवडणुकीसाठी राबवायला सुरुवात केली आहे.

### अदलाबदलीच्या राड्यात नेमके कोणते मतदार संघ?

महाविकास आघाडीचे नेते शरद पवार यांच्या सांगण्यानुसार २० टक्के जागांवर अदलाबदल होणार आहे, दरम्यान अदलाबदल होणारे हे मतदारसंघ कोणते? यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर शहर उत्तर आणि सोलापूर शहर दक्षिण या मतदारसंघांचा समावेश आहे का याबद्दलचा प्रचंड वाढलं आहे. काँग्रेसच्या ताब्यात असलेल्या या दोन्ही जागा शरद पवार आपल्या गटाकडे घेऊ शकतात असं शरद पवार यांच्या अत्यंत निकटवर्तीयांकडून मसुराज्यफला बुधवारी सांगण्यात आलं.

# तापलेले रण... उमेदवारांची वणवण


शरद पवार


बबनराव शिंदे


रणजितसिंह पाटील


रणजितसिंह शिंदे


मीनल साठे


शिवतेजसिह पाटील

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापूर जिल्ह्यातील विधानसभेच्या ११ मतदार संघांपैकी पक्ष आणि उमेदवाऱ्या या संदर्भात सर्वाधीक अनिश्चिततेचा आणि संभ्रमाची गडद छाया असलेला बहुचर्चीत मतदार संघ म्हणजे माढा विधानसभेचा आखाडा असं या मतदार संघाचं वर्णन करता येईल. विधानसभेच्या निवडणुकीसाठी इथलं रण प्रचंड तापलं असलं तरी तर्कवितर्क आणि अफवाचं मायंदाळ पीक या मतदार संघात आहे. नेमकं कोण आणि कोणत्या पक्षाकडून उभा ठाकणार? याचं ठोस उत्तर कोणाकडेच नाही,त्यातून संभ्रम दिवसेंदिवस वाढत राहिल्याचं या मतदार संघातील चित्र आहे. या मतदार संघातून इच्छुकांची नावे संख्येने अधिक आहेत. त्यातून उमेदवारी घोषित होण्याला आणखीन उशीर लागल्यास मतदारांपर्यंत उमेदवाराचं नाव पोचण्याला अडचणी येणार आहेत.**

#### माढा

विद्यमान आमदार आणि साखर सम्राट बबनराव शिंदे हे तसे माढा विधानसभेचे कैक वर्ष लोकप्रतिनिधी. या तालुक्यावर त्यांची मोठी हुकमत. या खेपेस निवडणुकीसाठी त्यांनी बाजूला सरत सुपुत्र सोलापूर जिल्हा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांचं नाव पुढं केलेलं. सत्तेच्या सारीपाटावरील बदलत्या राजकारणाची नांदी ओळखून आमदार बबनराव शिंदे यांनी सुपुत्रासाठी मोठी व्युहरचना आखलेली. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार यांच्या गटाच्या तुतारींच्या चिन्हावर सुपुत्राला उभे करण्यासाठी शरद पवार यांच्याकडे हेलपाटेदेखील मारलेले.

तथापि,याच टप्यावर आमदार बबनराव शिंदे यांचे बंधू उद्योजक रमेश शिंदे यांनी आपले सुपुत्र धनराज यांच्यासाठी तयारी ठेवलेली. उमेदवारीसाठी शरद पवार, सुप्रिया सुळे, राजेंद्र पवार, रोहित पवार यांच्याकडे लॉबिंग केलेले. याच मतदार संघासाठी भाजप पुरस्कृत विधान परिषदेचे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांचे नाव चर्चेत आहे. शिवरत्न उद्योग समुहाचे प्रमुख शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनीदेखील या मतदार संघात मोर्चेबांधणी केली होती. त्यामुळे शरद पवार गटाची उमेदवारी नेमकी कोण्या इच्छुकाला मिळणार? यासंबंधी माढ्याच्या मुलूखात प्रचंड संभ्रम आहे.

### जागेचं चित्र अस्पष्ट; मिनल साठेंची धावाधाव

राज्यात विधानसभेची निवडणूक हातात हात घालून महाविकास आघाडीच्या झेंड्याखाली लढताना माढ्याच्या जागेवर राष्ट्रवादी शरद पवार गटानं दावा सांगितला आहे. याच अनुषंगाने, या मतदार संघात पक्षाबरोबरच इच्छुकांकडून मोर्चेबांधणी सुरु आहे. परंतु, ही जागा काँग्रेसला सोडण्यात यावी, या पक्षाकडून आपण निवडणूक लढविण्यासाठी सज्ज आहोत असा नारा देत माजी नगराध्यक्षा मीनल साठे यांनी शर्थीचे प्रयत्न ठेवले आहेत. जागा वाटपात नेमकी जागा कोणाच्या वाट्याला हे चित्र लवकरच स्पष्ट झाले तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या सर्व संबंधितांमधील संभ्रम आणि अनिश्चिततेचे वातावरण दूर होईल.

# कल्याणशेट्टी फायनल, म्हेत्रे पिता-कन्येपैकी कोण?

✔ सोलापूर/प्रतिनिधी


आ. सचिन कल्याणशेट्टी


सिध्दाराम म्हेत्रे


शीतल म्हेत्रे

प्रत्येक विधानसभा निवडणूक ‘फाईट टू फाईट‘ होण्यातून आजवर चर्चेत राहिलेल्या अक्कलकोट विधानसभेच्या मतदार संघाचं अंतिम चित्रदेखील स्पष्ट होताना दिसत नाही. लढतीसाठी इथं पक्ष निश्चित असले तरी आणि त्यातही भाजपची उमेदवार विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना निश्चित असली तरी काँग्रेसच्या उमेदवारींचा तिढा सुटताना दिसत नाही. माजी गृहमंत्री सिद्धाराम म्हेत्रे हे आमदार कल्याणशेट्टी यांच्या विरोधात फाईट देणार की म्हेत्रे घराण्याचा नवा अन् फ्रेश वारसदार चेहरा म्हणून कन्या शीतल म्हेत्रे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवणार? यासंबंधीच्या तर्कविर्तकांच्या तालुक्यात उधाण आले आहे. हे चित्र एकीकडं असतानाच मलिकार्जुन पाटील यांचं नावदेखील काँग्रेसच्यावतीनं चर्चेत आणलं जात आहे.

माजीमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांची विधानसभेसाठी सज्जता दिसत आहे. कुरनूर धरण जलपूजन, कुंभारी, धोत्री, रुद्देवाडी यासह अनेक ठिकाणी सिद्धाराम म्हेत्रे यांचे कार्यक्रम झाले. जास्तीत लोकांच्या संपर्कात येण्याचा त्यांचा व्होरा दिसत आहे. त्याशिवाय प्रत्येक ठिकाणच्या कार्यक्रमात मतदारांनी काँग्रेसच्या पाठिशी उभे राहण्याचे आवाहन ते करीत आहेत. मात्र स्वत: विधानसभेच्या आखाड्यात आपण उभा ठाकू, आपले आशीर्वाद मला हवेत असे आवाहन मात्र त्यांच्याकडून होत नाही. त्यामुळे स्वत:च्या विधानसभेच्या जागेवर आपली राजकिय वारसदार कन्या म्हणून ते शीतल यांना निवडणूक लढवायला भाग पाडतात का? याबद्दल चर्चा होत असली तरी ठोस निर्णय जाहीर होत नाही. त्यामुळं काँग्रेसतर्फे म्हेत्रे यांच्यावतीने निवडणुकीच्या आखाड्यात कोण असणार? याबद्दलचे औत्सुक्य मतदारांना राहातानाच म्हेत्रे परिवारातील उमेदवारीबद्दल अनिश्चितता मानली जात आहे.

#### अक्कलकोट

विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना भाजपनं दुसऱ्यांदा उमेदवारी देऊ केल्याचं मानण्यात येतंय. त्यांच्या उमेदवारींच्या घोषणेची केवळ औपचारिकता राहिल्याचं सांगितलं जातंय. त्यामुळं काँग्रेसच्यावतीनं आखाड्यात कोणीही असो, भाजप पर्यायानं महायुतीकडून विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी हेच इथल्या आखाड्यात असतील हे अधोरेखीत आहे. वास्तविक आनंद तानवडे, रमेश पाटील, बाळासाहेब मोरे यांच्यासह पक्षामधील काही जण निवडणुकीसाठी इच्छुक असले तरी आमदार कल्यानशेट्टी यांचं रिपोर्ट कार्ड या निवडणुकीसाठी सगळ्यात उजवं आहे. कल्याणशेट्टी यांनी कोट्यवधींचा निधी मतदार संघात आणून चौफेर विकास साधला आहे. मतदार संघामधील प्रलंबित प्रश्न मार्गी लावली आहेत. त्यामुळे उमेदवारीसंबंधी भाजपनं केलेल्या सर्व्हेक्षणात कल्याणशेट्टींचा चेहरा निवडून येण्यासाठी सक्षम असल्याची माहिती समोर आली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे लोकसभा निवडणुकित आमदार कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट मतदार संघातून भाजप उमेदवाराला चांगलं मताधिक्य मिळवून दिलं. आमदारकी आणि पक्षीय आघाडी या दोन्ही बाबी लक्षात घेता, कल्याणशेट्टी यांचं भरीव योगदान राहिलं आहे, त्यातून निवडून येण्याच्या कसोटीवर आमदार कल्याणशेट्टी हा चेहरा उजवा ठरतो म्हणून त्यांच्या दुसऱ्या खेपेच्या उमेदवारींवर पक्ष श्रेष्ठींनी मोहर उमटवल्याचं मानलं जातंय.

### मल्लिकार्जून पाटलांचं नेमकं काय?

अक्कलकोट विधानसभेच्या आखाड्यात मलिकार्जुन पाटील उतरणार? अशी अधूनमधून चर्चा राहिली. निवडणुकीच्या अनुषंगाने, त्यांनी पक्षाकडे अर्ज भरला आहे. मात्र, आखाड्यात शड्डू ठोकण्याचा ते स्वत: दावा करीत नाहीत किंवा त्यांच्यावतीने तालुक्यातील काँग्रेसजणांपैकी कोणीच दावा करीत नाही. परवा रुद्देवाडी इथल्या कार्यक्रमात पाटील यांनी अत्यंत विधान केलं. त्यांच्या या विधानाचा अर्थ हा तळ्यात-मळ्यात असाच काढला गेला. मा ‘माजी गृहमंत्री सिद्धाराम म्हेत्रे हे निवडणूक लढवणार नसतील तर त्यांनी दिलेल्या उमेदवाराच्या पाठिशी मतदारांनी उभं राहावं’ असं ते विधान होतं. यावेळी त्यांनी आपण उभा राहणार हे ठोमपणे सांगितलं नाही. स्वत: सिद्धाराम म्हेत्रे आखाड्यात नसतील मात्र कन्या शीतल असतील तर त्यांच्या पाठिशी मतांची ताकद उभी करावी, असाही त्यांच्या विधानाचा अर्थ काढला गेला. तालुक्यात उमेदवारीवरुन चर्चा रंगली. पण काँग्रेसच्यावतीने ठोस उमेदवार कोण? याचं उत्तर अद्याप कोणाकडेच नाही. हे लक्षात घेता जिल्ह्यातील अन्य विधानसभेच्या मतदार संघांपैकी अक्कलकोट मतदार संघातदेखील संभ्रम आहे.